# प्रेसनोट

दि.०९/११/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | पारनेर पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)किशोर बाळासाहेब कळकुटे, वय–२३ वर्ष, बाहयस्त्रोत वायरमन, म.रा.वि.वि. कंपनी निघोज सेक्शन, ता.पारनेर, जि.अहमदनगर<br>२)विकास अशोक वायदंडे, वय–३० वर्ष, बाहयस्त्रोत ऑपरेटर, म.रा.वि.वि. कंपनी निघोज सेक्शन, ता.पारनेर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २८००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २८००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे निघोज, ता.पारनेर शिवारातील शेत गट नं.२१/१९ मधील शेत जमीन असून सदर ठिकाणी दोन खोल्याचे घर आहे, त्या ठिकाणचे इलेक्ट्रिक मीटर जळीत झाल्याने तेथे नवीन मीटर जोडणी करुन देण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक क्र.१ किशोर बाळासाहेब कळकुटे, बाहयस्त्रोत वायरमन यांनी ३०००/– रुपये लाच मागणी केल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन आज दि.०९/११/२०२२ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक क्र.१ किशोर बाळासाहेब कळकुटे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे २८००/– रुपये लाचेची मागणी केली व सदर लाच रक्कम आरोपी लोकसेवक क्र.२ विकास अशोक वायदंडे, बाहयस्त्रोत ऑपरेटर यांचेकडे देण्यास सांगितले. त्यानुसार म.रा.वि.वितरण कंपनी कार्यालय, निघोज, ता.पारनेर येथे सापळा आयोजित करण्यात आला. सदर सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष आरोपी लोकसेवक क्र.२ विकास अशोक वायदंडे यांनी आरोपी लोकसेवक क्र.१ किशोर बाळासाहेब कळकुटे यांचे सांगणेवरुन पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडुन सदर लाच रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत पारनेर पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर